# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 28.05.2025** **वार- बुधवार**

---

**पाऊस**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर पावसाची उघडीप होती, दुपारनंतर पुन्हा जोरदार सरी कोसळल्या. उद्या हलक्या पावसाची शक्यता असून कमाल तापमान 29 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**पाऊस बाधा**

राज्यात गेले 20 दिवस 34 तालुक्यांमध्ये झालेल्या पावसामुळं पिकांचं बाधित क्षेत्र आता 40 हजार 949 हेक्टरवर पोहोचलं आहे. अमरावती, बुलडाणा, जळगाव, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांना सर्वाधिक तडाखा बसल्याचं पुण्यातील कृषी विभागाच्या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. जमिनीला वाफसा लवकर येण्याची चिन्हं कमी असल्यानं खरीप हंगामातील पेरण्याही लांबण्याची शक्यता आहे.

**बियाणे**

यावर्षीच्या खरीप हंगामासाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण अभियानाच्या अंतर्गत भात, तुर, मुग, उडीद, मका, बाजरी, नाचणी, वरई आणि कापूस तसंच  राष्ट्रीय खाद्यतेल अभियान तेलबिया अंतर्गत -

सोयाबीन, सुर्यफूल, भुईमूग, तीळ पिकांच्या अनुदानावरील प्रमाणित बियाणांकरिता अर्ज करण्याचं आवाहन पुण्यातील कृषी आयुक्तालयानं केलं आहे.

**सावरकर**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त पुण्यात विविध संस्थांद्वारे आज त्यांना अभिवादन करण्यात आलं. फर्ग्युसन महाविद्यालयात सावरकरांच्या क्रांतिकारी कार्याची साक्ष असलेली ऐतिहासिक खोली क्रमांक 17 नागरिकांसाठी आज खुली ठेवण्यात आली होती. 1902 ते 1905 या कालावधीत विद्यार्थी असताना सावरकर यांचं वास्तव्य या खोलीत होते. या खोलीतूनच ‘अभिनव भारत ’ सारख्या संघटनेची पायाभरणी, स्वदेशी चळवळीची सुरुवात, विदेशी वस्त्रांची होळी यांसारख्या क्रांतिकारी उपक्रमांची आखणी करण्यात आली होती. तसंच त्यांनी ‘सिंहगडाचा पोवाडा’ , ‘बाजीप्रभू देशपांडे’ यांसारखी राष्ट्रप्रेरक काव्यरचना इथं केली.

पुणे महापालिकेचे आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी महापालिकेतील सावरकर यांच्या तैलचित्राला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्र-कुलगुरू डॉक्टर पराग काळकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. याप्रसंगी शैक्षणिक आणि प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**नाले**

पुणे शहरात गेल्या आठवड्यापासून झालेल्या दमदार पावसानंतर महापालिकेनं गटारं, नाले यांची स्वच्छता, देखभाल आणि दुरुस्तीसाठी साडेचार कोटी रुपयांच्या निविदा काढल्या आहेत. याच कामांसाठी महापालिकेनं मार्च-एप्रिल महिन्यात 27 कोटी रुपयांच्या निविदा काढल्या होत्या. शहरातील

नाले, ओढे, पावसाळी गटारं स्वच्छ करण्याची कामं योग्य पद्धतीनं झाली असल्याचा दावा ठेकेदाराकडून केला जात असला तरी अलिकडच्या पावसामुळं शहराच्या अनेक भागात पाणी साचल्याचं पाहायला मिळालं.

**<u>फांद्या</u>**

पुणे शहरात सध्या पडत असलेल्या पावसामुळं कर्वेनगर परिसरात झाड कोसळून एका तरुणाचा मृत्यू झाला. त्यामुळं रस्त्यावरील झाडं आणि झांडांच्या धोकादायक फांद्यांबाबत पुणे महापालिकेचा उद्यान विभाग आणि क्षेत्रीय कार्यालयाकडं अनेक तक्रारी आल्या आहेत.

**<u>लिंबू</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुलटेकडी आवारात फळभाजी विभागात लिंबू विकण्यास समिती प्रशासनानं आदेशाद्वारे मनाई केली आहे. लिंबू हे फळ असल्यानं त्याची विक्री फळ बाजारात करण्यात यावी असं समिती प्रशासनानं लिंबू उत्पादकांना सूचित केलं आहे.

**<u>आंदोलन</u>**

पुण्यातील एरंडवणे भागातल्या भीम नगर झोपडपट्टीचं एसआरए अंतर्गत पुनर्वसन करण्याच्या योजनेत झोपडपट्टीधारकांची कोणतीही फसवणूक होऊ देऊ नका, गरज पडल्यास नागरिकांना आणखी सुविधा द्याव्यात किंवा संपूर्ण योजना रद्द करावी असे आदेश उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश गटणे यांना दिले आहेत. या योजनेत फसवणूक आणि भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत झोपडपट्टीधारकांनी आंदोलन पुकारलं आहे. या पार्श्वभूमीवर पाटील आणि झोपडपट्टीधारकांचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत नागरिकांच्या

समस्या ऐकून घेतल्यानंतर झोपडपट्टीधारकांची फसवणूक होणार नाही, याची काळजी घेण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

**कार्यशाळा**

पुण्याचं विभागीय माहिती कार्यालय आणि पुणे श्रमिक पत्रकार संघाद्वारे पत्रकारांसाठी असलेल्या शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी विकास पत्रकारिता कार्यशाळेचं आज आयोजन करण्यात आलं. याप्रसंगी माहिती उपसंचालक डॉक्टर किरण मोघे म्हणाले की वास्तवाचा स्वीकार, विश्लेषण, मूल्यांकन आणि सामाजिक जबाबदारी या चार पैलूंवर विकास पत्रकारिता आधारीत आहे. अशा पत्रकारितेला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनातर्फे विकास पत्रकारिता पुरस्कार देण्यासोबतच विविध योजना सुरू केल्याची माहिती त्यांनी दिली.

**मॅनेजमेंट**

पुणे व्यवस्थापन संघटनेचा एकोणपन्नासावा स्थापना दिवस आणि वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा पुण्यात आज आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी विविध पुरस्कारांचं वितरण तसंच एचआर मित्र या त्रैमासिकाचं प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आलं. पुणे व्यवस्थापन संघटनेचे अध्यक्ष बाळ पाटील, 'सकाळ' माध्यम समूहाचे सम्राट फडणीस, ॲकॅडमिक अलायन्सचे ऋषिकेश धांडे प्रामुख्यानं यावेळी उपस्थित होते.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**